**नियमित दिवाणी दावा क्र.०३/२०२२**

**निशाणी क्र.२६ वरील आदेश**

**श्री.सदाशिव मुकुंद नार्वेकर वि. श्री.रमाकांत मुकुंद नार्वेकर व.२**

प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला ''कैफियत नाही'' हा आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारणेची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या मते, प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी योग्य मुदतीत दाव्याच्या गुणदोषावर कैफियत सादर केलेले नसल्याने त्यांचेविरुद्ध ''कैफियत नाही'' चा आदेश झालेला आहे. प्रतिवादी क्र. १ हे सुमारे ९३ वर्षे वयाचे तसेच प्रतिवादी क्र. २ हे सुमारे ८२ वर्षे वयाचे वयोवृद्ध व्यक्ती असल्याने प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना त्यांच्या वकीलांना वेळेत भेटून दाव्याच्या गुणदोषावर कैफियत करावयाच्या सदंर्भात आवश्यक ती माहिती व कागद वेळेत पुरविणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांना विहित मुदतीत दाव्याच्या गुणदोषावर कैफियत दाखल करता आली नाही. प्रतिवादी क्र. १ व २ यांना दाव्याच्या गुणदोषावर कैफियत दाखल करायची आहे. अन्यथा त्यांचे पैशाचे स्वरुपात कधीही भरुन न येणारे असे अपरिमित स्वरुपाचे नुकसान होणारे आहे. विहित मुदतीत कैफियत सादर न करण्यामागे प्रतिवादी क्र. १ व २ यांचा कोणताही गैरहेतु अथवा निष्काळजीपणा नव्हता व नाही. सबब, अर्ज.

३. वादी यांनी अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दाखल केले आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. १ हे मयत आहेत. प्रतिवादी क्र. २ हे उशिराने कैफियत देत असल्याने जास्तीत जास्त खर्च करुन अर्ज मंजुर करण्याची मागणी केली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द हक्कप्रस्थापना व कायमच्या ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांना बेलीफांच्या अहवालानुसार दि.१८.०१.२०२२ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी झाली. परंतु, ९०

दिवसांच्या मुदतीमध्ये त्यांनी कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ व २ यांचेविरुध्द दि.०५.०७.२०२२ रोजी 'कैफियत नाही' असा आदेश पारीत झालेला आहे. त्यानंतर दि.३०.०१.२०२५ रोजी प्रस्तुत अर्ज देण्यात आला आहे. म्हणजेच कैफियत दाखल करणेस सुमारे ०२ वर्ष ०९ महिने व १५ दिवसांचा विलंब झालेला आहे.

६. वादीने नि.क्र.३० च्या यादीसोबत प्रतिवादी क्र.१ च्या मृत्यु प्रमाणपत्राची सहीसुद नक्कल हजर केली आहे. सदर मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. १ रमाकांत मुकुंद नार्वेकर हे दि.२६.०३.२०२५ रोजी वैश्यवाडा, सावंतवाडी, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग येथे मयत झाले असल्याचे दिसुन येते. त्यामुळे प्रस्तुत अर्ज हा केवळ प्रतिवादी क्र. २ यांचेबाबत विचारात घेण्यात येत आहे.

७. प्रतिवादी हे वयोवृद्ध असल्याने दाव्यासंदर्भात महत्वाची कागदपत्रे तसेच दाव्यासंदर्भातील माहिती वकीलांना देऊ न शकल्याने; वेळेत कैफियत देणे शक्य झाले नाही, असे कारण नमुद केले आहे. परंतु, कैफियत देण्यामागे झालेल्या विलंबाचा विचार करता, सदरचे कारण स्विकारता येणार नाही. तथापि, दाव्याचे स्वरुप विचारात घेता, दाव्याचा निकाल गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादीला झालेला त्रास हा खर्च स्वरुपात भरुन काढता येऊ शकतो. प्रतिवादी क्र. २ ने कैफियत दाखल करण्यामध्ये खूपच उशिर केलेला आहे. त्याबाबत त्याचेवर खर्च लादणे आवश्यक ठरते. यासर्व बाबींचा साकल्याने विचार करता अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे. सबब, आदेश.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. २ यांनी वादीला खर्च म्हणून रुपये १,०००/-

(र.रु.एक हजार मात्र) देण्याच्या अटीवर त्याचेविरुध्द झालेला 'विना कैफियतचा' आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र. २ यांनी पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम वादीस द्यावी. त्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

SHIVAJI PANDURANG PATIL

Digitally signed by SHIVAJI PANDURANG PATIL
Date: 2026.08.14 18:37:53 +0530

दिनांक–१३.०८.२०२६ (एस.पी.पाटील)

ठिकाण– सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी